विभागीय वन अधिकारी संवर्गातील
अधिकाऱ्याची बदली...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक : एमएफएस-२०१९/प्र.क्र. ३७/फ-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मे, २०१९.

संदर्भ :- शासन आदेश महसूल व वन विभाग क्रमांक : एमएफएस- २०१८/प्र.क्र. ४८१/ फ- १ , दि. १ मार्च ,२०१९.

शासन आदेश :-

महाराष्ट्र वनसेवा, गट-अ (वरीष्ठ श्रेणी) मधील विभागीय वन अधिकारी या संवर्गातील खाली नमूद अधिकारी यांची शासकीय कर्मचाऱ्याची बदल्यांचे विनियम आणि शासकीय कामे पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे. :-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व सद्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना	अभिप्राय
१.	श्रीमती सरोज म.गवस, विभागीय वन अधिकारी (अवैध शिकार प्रतिबंधक घटक),ठाणे	विभागीय वन अधिकारी (नियोजन) ठाणे	अधिनियम २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) नुसार (रिक्त पदावर) (प्रशासकीय कारणास्तव)

२. सदर नियुक्ती / पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास दि.०१/०६/२०१९ रोजी कार्यमुक्त करावे. तसेच, संबंधित अधिकाऱ्याला नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

४. संबंधित अधिकाऱ्याला शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित अधिकाऱ्याला मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

५. सदरहू बदली आदेशानुसार संबधित अधिकारी नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०५२८११३०३८४६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Niwrutti Dhas

Digitally signed by Anil Niwrutti Dhas
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=699d21cc89897191099434d443603426329c81b1b292ed2d168c892811118cc7, serialNumber=f85f1c64c05886c8d514e40d54d27ff3a80ffd907a05433b1c412b7f7ffa0afd, cn=Anil Niwrutti Dhas
Date: 2019.05.28 11:37:15 +05'30'

(अनिल धस)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे/ कोल्हापूर.
५) महालेखापाल,महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र १,मुंबई
६) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
७) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
८) मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
९) प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१०) संबंधित अधिकारी (प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत)
११) वन विभागातील सर्व कार्यासने
१२) निवड नस्ती (फ-८ कार्यासन).